सत्र खटला क्र. ११३/२०१९
सरकार -वि- कृपाल सिंग
निशाणी क्रमांक-३३

सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ याची जबानी

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव - रविंद्र पुरूषोत्तम बोराळकर**

**वय - ५१ वर्ष, व्यवसाय - नौकरी**

**राहणार - कु-हा ता. मोताळा, जि. बुलढाणा**

**अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. एस. एच. जोशी**

०१. मी २००७ सालापासुन महावितरण विज कंपनी मध्ये कार्यरत असून २०१५ पासून वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून काम करत आहे. घटना २०१९ साली घडली. त्यावेळी मी धामणगांव बढे कार्यालयाअंर्तगत कु-हा विभागामध्ये गोतमारा व हणवंतखेड या गावांच्या विज वितरणाचे काम बघत होतो. संध्याकाळी अंदाजे ६.३० वाजता कु-हा गावामधील डीपीचा डीओ गेल्यामुळे तो टाकण्यासाठी मी डीपी कडे जात होतो. त्यावेळी आरोपी तेथे आला व मला म्हणाला की, गावातील नळ आलेकीच लाईट कशी जाते त्यावरून तो माझ्यासोबत हुज्जत घालूलागला. मी माझे वरीष्ठ डहाके साहेब यांना फोन केला त्यावेळी त्याने मला मारहाण करण्यास सुरूवात केली. त्यावेळी मी आरोपीला मला माझे काम करण्यास जावूद्या अशी विनंती केली. त्यावेळी त्याने मला धमकी दिली की, तु डीपीवर काम करत असतांना डीपी चालुबंद करून तुला जिवे मारून टाकेल. मी जिवलालसिंग झाडे यांना फोन करून आरोपीने मारहाण केल्याची व डीपीवर डीओ टाकण्यासाठी तो जावू देत नसल्याची माहिती दिली. त्यानंतर मी व माझी पत्नी पोलिस ठाणे येथे जात असतांना मला जिवलालसिंग झाडे यांचा फोन आला व मी त्यांना पोलिस ठाण्यात जात आहे असे सांगितल्यावर त्यांनी मला दारासिंग सांबळे यांच्या घरासमोर बोलावले. त्यानं–

तर आम्ही तेथे गेलो. त्यावेळी जिवलालसिंग याने मला मारहाणीबद्दल विचारणा केली असता मी आरोपीने मारल्याचे सांगितल्यावर आरोपीने मला माझ्या पत्नी समोर परत मारहाण केली.  त्यानंतर मी पोलिस ठाणे धामणगांव बढे येथे घटनेची फिर्याद दाखल केली. फिर्याद मला दाखविली, ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. ती **निशाणी क्र.३४** वर आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर फिर्यादीवरून पोलिसांनी घटनेचा प्रथमिक अहवाल नोंदविला तो मला दाखविला त्यावर माझी सही आहे. तो **निशाणी क्र.३५** वर आहे. मी पोलिसांना घटनास्थळ दाखविले होते. पोलिसांनी मला वैद्यकीय तपासणीसाठी प्राथमिक आरोग्यकेंद्र धामणगांव बढे येथे पाठविले होते. मी पोलिसांना माझ्या कर्तव्यसुची व कार्यालयीन आदेशाच्या प्रती तपासादरम्यान दिल्या होत्या. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. आरोपी न्यायालयासमक्ष हजर आहे. तो तोच आहे.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. जी. डी. पाटील**

०२. माझ्याकडे तीन गावांची जबाबदारी असल्यामुळे मला मुख्यालयी राहणे बंधण–कारक होते. सदर तीनही गावांचे काम मी एकटाच बघत होतो. त्यामुळे माझी ब-याचदा धावपळ होत होती. नळाला पाणी आल्यानंतर ब-याच वेळेस डीओ पडून विज जात असायची. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे गावक-यांचा विज कंपनीवर रोष होता. माझ्या घराजवळ आरोपीचा भाऊ बजेसिंग तगरे याचे घर आहे. घटनेच्या दोन दिवस अगोदर बजेसिंग तगरे व आमच्या कुटुंबाचा नालीच्या कारणावरून किरकोळ वाद झाला होता. सदर वाद मी व बजेसिंग तगरे व गावातील लोकांनी मिटवला होता. त्यानंतर दोन दिव–सांनी आरोपीने माझ्याकडे येवून तु माझ्या भावासोबत वाद केला, गावामध्ये विज राहत नाही व डीओ नेहमी पडतो म्हणून वरिष्ठांकडे तुझी तक्रार करतो असे मला म्हटले होते. घटनास्थळ हे दाट वस्तीमधील असून तेथे बरीच घरे आहेत. घटनेच्या वेळी तेथे ७ ते ८ लोक जमा झाले होते. घटना अंदाजे पाच मिनीटे चालली. मंगलसिंग पडवळ हा माझा

शेजारी असून माझे त्याच्याशी चांगले संबंध आहे. घटनेच्यावेळी माझ्याकडे स्वतःची मोटारसायकल होती. कु-हा गावापासून पोलिस ठाणे धामणगांव बढे १० ते १२ कि.मी. अंतरावर आहे. मी जुलालसिंग झाडे याला फोनकरून घटना सांगितली हे फिर्याद व बयान देतेवेळी सांगितले होते की नाही हे मला आठवत नाही. तसेच त्यानंतर मी व माझी पत्नी पोलिस ठाणे येथे जात असतांना मला जिवलालसिंग सिंग झाडे यांचा फोन आला व मी त्यांना पोलिस ठाण्यात जात आहे असे सांगितल्यावर त्यानी मला दारासिंग सांबळे यांच्या घरासमोर बोलावले. त्यानंतर आम्ही तेथे गेलो. त्यावेळी जिवलालसिंग याने मला मारहाणीबद्दल विचारणा केली असता मी आरोपीने मारल्याचे सांगितल्यावर आरोपीने मला माझ्या पत्नी समोर परत मारहाण केली हे ही फिर्याद व बयान देतेवेळी सांगितले होते की नाही हे मला आठवत नाही. अशोक वाघ, विनोद तायडे, रामेश्वर वाघ, कुणाल साबळे, हिम्मत साबळे, शैनसिंग झाडे, सुरेश तायडे, दारासिंग साबळे यांच्याशी माझे चांगले संबंध आहे. विजेच्या खांब्यावरून चढउतार करतांना एखाद्यावेळेस अंगावर जखम होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला तक्रार करतो असे म्हटल्यामुळे मी त्याच्या विरूध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2025.12.06 15:15:40 +0530

दिनांक - ०६/१२/२०२५

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

**CERTIFICATE**

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 06.12.2025 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 06.12.2025 |
| Date of uploading | : | 06.12.2025 |